# 'मुंबई मेट्रो-३' चा जाहिरात परवाना खासगी कंपनीला! १५ वर्षांचा करार

■ मुंबई

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मुंबई मेट्रो-३ च्या बाह्य जाहिरातींसाठी अधिकाराचा परवाना टाइम्स इनोव्हेटिव्ह मीडिया लिमिटेड कंपनीला दिला. पुढील पंधरा वर्षांच्या कालावधीसाठी हा परवाना असणार आहे.यामध्ये २७ स्थानके,३१ गाड्या, अन्सिलरी इमारतींमधील एकूण २० हजार चौरस मीटर जागेसह स्थानकांच्या नावांच्या अधिकारांचाही समावेश आहे.

यापूर्वी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने स्थानक नाम अधिकार,टेलिकॉम इन-बिल्डिंग सोल्यूशन्स, ऑप्टिकल फायबर केबल्सच्या निविदा काढल्या आहेत.सुमारे दीड लाख चौरस फुटांच्या व्यावसायिक जागांच्या परवान्यासाठीच्या निविदा



खुली केल्या आहेत व त्यास मोठा प्रतिसादही मिळत आहे. ऑक्टस डव्हायझर्स-स्टुडिओ पीओडी कन्सोर्टियम यांना सर्व मेट्रो-३ च्या नॉन-फेअर बॉक्सद्वारे होणाऱ्या महसूल प्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या विविध कामांसाठी सल्लागार म्हणून नेमले आहे.

मुंबईच्या पहिल्या पूर्णतः भूमिगत मेट्रो मार्ग ३ चे पहिल्या टप्प्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. कफ परेड ते आरे पर्यंत २७ स्थानकांद्वारे हा मेट्रो मार्ग जोडला गेला आहे. ही मार्गिका बीकेसी,विमानतळ टर्मिनल १ आणि टर्मिनल २, वरळी,दादर,सिद्धिविनायक, सीएसएमटी,चर्चगेट, हुतात्मा चौक आणि विधान भवन यांसारख्या शहरातील प्रमुख ठिकाणांना जोडते. बाह्य जाहिरातींसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली, यामध्ये सहा कंपन्यांनी सहभाग घेतला.